| Roll No. | | | | | | | | | | | | Serial No. of Q. C. A. B. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 60 + 14 = 74 ] [ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 16

Total No. of Questions : 60 + 14 = 74 ] [ Total No. of Printed Pages : 16

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 85-M** **ವಿಷಯ : ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನ**

**Code No. : 85-M** **Subject : SOCIAL SCIENCE**

( ಮರಾಠಿ ಭಾಷಾಂತರ / Marathi Version )

ದಿನಾಂಕ : 02. 04. 2009 ] [ Date : 02. 04. 2009

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 10-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1-30 ರವರೆಗೆ ] [ Time : 10-30 A.M. to 1-30 P.M.

ಪರಮಾವಧಿ ಅಂಕಗಳು : 100 ] [ Max. Marks : 100

**FOR OFFICE USE ONLY**

**PART – A**

| Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | | 11. | | 21. | | 31. | | 41. | | 51. | |
| 2. | | 12. | | 22. | | 32. | | 42. | | 52. | |
| 3. | | 13. | | 23. | | 33. | | 43. | | 53. | |
| 4. | | 14. | | 24. | | 34. | | 44. | | 54. | |
| 5. | | 15. | | 25. | | 35. | | 45. | | 55. | |
| 6. | | 16. | | 26. | | 36. | | 46. | | 56. | |
| 7. | | 17. | | 27. | | 37. | | 47. | | 57. | |
| 8. | | 18. | | 28. | | 38. | | 48. | | 58. | |
| 9. | | 19. | | 29. | | 39. | | 49. | | 59. | |
| 10. | | 20. | | 30. | | 40. | | 50. | | 60. | |

***Total Marks of Part – A***

**PART – B**

| Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 61. | | 64. | | 67. | | 70. | | 73. | |
| 62. | | 65. | | 68. | | 71. | | 74. | |
| 63. | | 66. | | 69. | | 72. | | × | × |

***Total Marks of Part – B***

| **Total Marks in words** | | **Grand Total** | |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 1. ✓ | | ✓ | ✓ |
| 2. ✓ | | | |
| *Signature of Evaluators* | *Registration No.* | *Signature of the Deputy Chief* | *Signature of the Room Invigilator* |

**सामान्य सूचना :**

i) प्रश्न व उत्तरपत्रिका एकत्रित असून, त्यात दोन विभाग आहेत, **Part - A** व **Part - B**.

ii) **Part - A** मध्ये 60 व **Part - B** मध्ये 14 प्रश्न आहेत.

iii) प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी पुस्तिकेमध्येच जागा दिलेली आहे.

iv) **Part - A** मध्ये प्रत्येक प्रश्नाला किंवा अपूर्ण वाक्यांशाला चार बहुपर्यायी उत्तरे दिली आहेत. त्यापैकी एक पर्याय बरोबर आहे. दिलेल्या सूचना वाचून योग्य पर्याय प्रश्नाच्या खालील दिलेल्या जगामध्ये लिहा.

v) **Part - B** मध्ये प्रत्येक प्रश्नासाठी पुरेशी जागा दिलेली आहे. दिलेल्या जागेमध्ये प्रश्नांची उत्तरे लिहावे.

## PART - A

प्रत्येक प्रश्नाला किंवा अपूर्ण वाक्यांशाला चार बहुपर्यायी उत्तरे दिलेले आहे. त्यापैकी एक पर्याय बरोबर आहे. योग्य पर्याय निवडून त्याखालील जगामध्ये लिहा : $60 \times 1 = 60$

1. भारतामध्ये पोर्तुगीज सत्तेचा पाया यानी बळकट केला —

(A) वास्को-द-गामा (B) अल्मिडा

(C) बार्थालोमियो (D) अल्फान्सो-द-अल्बूकर्क.

उत्तर : ____________________

2. वाँदिवॉशच्या लढाईत फ्रेंच सैन्याचा पराभव या इंग्रज सेनापतीने केला —

(A) नेल्सन (B) आयरे कूट

(C) हॅवलॉक (D) जॉन निकोल्सन.

उत्तर : ____________________

3. 1857 च्या उठावात नानासाहेब कानपूरमध्ये लढले, तर बेगम हजरत महल येथे लढली —

(A) लखनौ (B) झांसी

(C) मिरत (D) बराकपूर.

उत्तर : ____________________

4. ब्रिटिश काळामध्ये 'महल' याचा शब्दश: अर्थ असा आहे —

(A) जिल्हा (B) राज्य

(C) तालुका (D) राजवाडा.

उत्तर : ____________________

5. 'मोग्लिंग' या मिशनऱ्यांने कन्नड भाषेतील हे पहिले वृत्तपत्र सुरु केले —

(A) अमृत बझार पत्रिका (B) मंगळूरू समाचार

(C) द हिन्दू (D) सुबोध पत्रिका.

उत्तर : ____________________

6. या पैकी कोणी सर्वऋतू राजमार्ग ( ट्रंक रोडस् ) निर्माण करण्याची योजना आखली ?

(A) डलहौसी (B) मन्रो

(C) विलियम बेंटिंक (D) कर्झन.

उत्तर : ____________________

7. सरदार वल्लभभाई पटेल यांनी कोणत्या संस्थाना विरुद्ध पोलिस कारवाई केली ?

(A) जुनागड (B) जम्मू-काश्मीर

(C) म्हैसूर (D) हैद्राबाद.

उत्तर : ____________________

8. 'म्हैसूर' राज्याची निर्मिती या पैकी खालील दिवशी झाली —

(A) 1 नोव्हेंबर, 1956 (B) 14 ऑगस्ट, 1947

(C) 1 नोव्हेंबर, 1973 (D) 15 ऑगस्ट, 1947.

उत्तर : ____________________

9. ऑस्ट्रियन राजपुत्राचा खून या पैकी पुढील शहरात झाला —

(A) कॉन्स्टंटिनोपल (B) सॅराजेव्हो

(C) पॅरिस (D) फ्लोरेन्स.

उत्तर : ____________________

10. देशातील लोकशाहीचे यश यावर अवलंबून असते —

(A) लोकांचे शिक्षण (B) लोकांच्या संघटना

(C) लोक संपत्ती (D) लोकांचे आरोग्य.

उत्तर : ____________________

11. यूरोपीय समुदायातील सध्याची चलन पद्धती ही आहे —

(A) रुपया (B) पौंड

(C) डॉलर (D) यूरो.

उत्तर : ____________________

12. भांडवलशाही राष्ट्रे किंवा कम्युनिस्ट राष्ट्रे अशा कोणत्याही गटात सामील नसलेल्या देशांच्या गटाला असे म्हणतात —

(A) आण्विक जग (B) प्राचीन जग

(C) नवे जग (D) तृतीय जग.

उत्तर : ____________________

13. सर्वोच्च हिमालय पर्वत रांगाना असेही म्हणतात —

(A) हिमाद्री (B) हिमाचल

(C) सिवालिक्स (D) विंध्य.

उत्तर : ____________________

14. 'चंदन' ही वनस्पती या प्रकारच्या अरण्य प्रदेशात वाढते —

(A) मँग्रोव्ह अरण्ये (B) सदाहरित अरण्ये

(C) पानझडी वृक्ष अरण्ये (D) काटेरी वनस्पती.

उत्तर : ____________________

15. ॲल्युमिनियम उत्पादनात या पैकी हे खनिज कच्चा माल म्हणून वापरतात —

(A) मँगेनीज (B) बॉक्साईट

(C) हेमेटाईट (D) मॅग्नेटाईट.

उत्तर : ____________________

16. दिल्ली जवळील गुरगाव येथे पुढील पैकी कोणत्या प्रकाराचे संशोधन केंद्र आहे ?

(A) पवन ऊर्जा (B) सौर ऊर्जा

(C) जल ऊर्जा (D) औष्णीक ऊर्जा ।

उत्तर : ____________________

17. भारत या देशाला प्रामुख्याने लोखंडाची निर्यात करतो —

(A) चीन (B) इरान

(C) जपान (D) इटली.

उत्तर : ____________________

18. बुट्ट्या विणणे हा कुटिर उद्योगाचा भाग आहे, तर इलेक्ट्रिक फॅन ( विद्युत पंखे ) बनविणे हे कोणत्या प्रकारच्या उद्योगात येते ?

(A) लघु उद्योग (B) मध्यम उद्योग

(C) अवजड उद्योग (D) विशेष उद्योग.

उत्तर : ____________________

19. कुटिर उद्योगात ( घरगुती उद्योगात ) तयार झालेली उत्पादने या बाजार पेठेत जास्त करून विकली जातात —

(A) राष्ट्रीय बाजार पेठ (B) राज्य स्तरीय बाजार पेठ

(C) स्थानिक बाजार पेठ (D) आंतरराष्ट्रीय बाजार पेठ.

उत्तर : ____________________

20. भारताचा परदेशी व्यापार मुख्यत: या मार्गाने चालतो —

(A) रस्ते मार्ग (B) समुद्र मार्ग

(C) रेल्वे मार्ग (D) हवाई मार्ग.

उत्तर : ____________________

21. खालील पैकी कोणत्या पद्धताचा स्वीकार सर्वप्रथम हैद्राबादच्या निजामाने केला ?

(A) सैन्य भरती पद्धत
(B) करमुक्त व्यापार पद्धत
(C) सहाय्यक सैन्य पद्धत
(D) डॉक्ट्रिन ऑफ लॅप्स पद्धत.

उत्तर : ______________________

22. 'आदर्श आधुनिक म्हैसूरचा' निर्माता वडेयर मध्ये असे यांना म्हणतात —

(A) नरसराज वडेयर
(B) कृष्णराज वडेयर चौथा
(C) राज वडेयर
(D) चिक्कदेवराज वडेयर.

उत्तर : ______________________

23. मूलभूत विचारांवर आधारित अशा हिंदू समाजाची बांधणी करण्यासाठी 'बेदांकडे परत चला' अशी हाक कोणी दिली ?

(A) आत्माराम पांडुरंग
(B) दयानंद सरस्वती
(C) राजा राममोहन राय
(D) स्वामी विवेकानंद.

उत्तर : ______________________

24. ज्योतिराव फुलेंच्या मते समाजोन्नती आणि दलितांची शोषण थांबविण्यासाठी मुख्यास्त्र कोणत्या आहे ?

(A) कामगार संघटना
(B) पददलितांना आरक्षण
(C) शिक्षणाचा प्रसार
(D) विधवा पुनर्विवाहास प्रोत्साहन.

उत्तर : ______________________

25. मुधोळ संस्थाच्या हलगलीमधील बेड लोकांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढा देण्यास कोणता कायदा कारणीभूत झाला ?

(A) रेग्युलेटिंग ॲक्ट
(B) शस्त्र बंदी कायदा ( Arms Act )
(C) एनलिस्टमेंट ॲक्ट
(D) व्हर्नाक्युलर ॲक्ट.

उत्तर : ______________________

26. सरदार वल्लभभाई पटेल यांना 'भारताचे पोलादी पुरुष' म्हणतात, कारण

(A) भारताचे गृहमंत्री झाले म्हणून
(B) जुनागड भारतात विलिन केले
(C) सर्व देशी संस्थानांचे विलिनीकरण केले
(D) संस्थानिकांना तनखा दिला म्हणून.

उत्तर : ______________________

27. माओ त्से तुंग यांनी अवलंबिलेल्या 'लीप फॉर्वर्ड' धोरणाचा परिणाम या पैकी एक आहे —

(A) शेतकऱ्यांमधील असंतुष्टता
(B) आर्थिक स्थिती सुधारली
(C) संयुक्त शेतीची सुरुवात
(D) वैयक्तीक मालकी हक्क रद्द.

उत्तर : ______________________

28. पहिल्या महायुद्धानंतर जागतिक शांततेकरीता कोणती संस्था स्थापन करण्यात आली ?

(A) रेड क्रॉस सोसायटी (B) ॲमनेस्टी इंटरनॅशनल्

(C) लीग ऑफ नेशन्स ( राष्ट्र संघ ) (D) संयुक्त राष्ट्र संघटना ( UNO ).

उत्तर : ____________________

29. 'शस्त्रास्त्र स्पर्धा' म्हणजे —

(A) एकमेका देशांमधील संशयाचे वातावरण

(B) युद्ध सामग्री आधुनिककरणे आणि सैन्यबल मजबूत करणे

(C) शस्त्र साठा करणे

(D) शस्त्र स्पर्धा करणे.

उत्तर : ____________________

30. 'शीत युद्ध' म्हणजे

(A) आक्रमक राष्ट्रवाद

(B) शस्त्र स्पर्धा

(C) गुप्त लष्करी करार

(D) दोन शक्तीशाली गटाच्या विचारणमधील मतभेद.

उत्तर : ____________________

31. युनोच्या कोणत्या शाखेत युनोच्या सर्व सभासदांचा समावेश होतो ?

(A) सुरक्षा समिति (B) आर्थिक आणि सामाजिक समिति

(C) महासभा (D) विश्वस्थ समिति.

उत्तर : ____________________

32. सुरक्षा समिति मध्ये 'व्हिटो' चा अधिकार यांना आहे —

(A) हंगामी सदस्य (B) कायम सदस्य

(C) नियुक्त सदस्य (D) नेमणूक केलेले सदस्य.

उत्तर : ____________________

33. जागतिक आरोग्य संघटनेची ( WHO ) महत्त्वाची कामगिरी म्हणजे

(A) साथीच्या रोगाचे ( epidemics ) नियंत्रण (B) द्रारिद्र्य निर्मूलन

(C) पर्यावरणाचे रक्षण (D) देवी रोगाचे जगातून उच्चाटन केले.

उत्तर : ____________________

34. व्यक्तीच्या उन्नती आणि अस्तित्वासाठी याची आवश्यकता आहे —

(A) मूलभूत हक्क (B) जन्मसिद्ध हक्क

(C) मानवी हक्क (D) विशेष अधिकार.

उत्तर : ______

35. वर्णद्वेष आणि गुलामगिरीचे जगातून उच्चाटन करण्यासाठी सर्वप्रथम यांनी आवाज उठविला —

(A) जॉन एफ० केनेडी (B) गांधीजी

(C) नेल्सन मंडेला (D) अब्राहम लिंकन.

उत्तर : ______

36. हे मनुष्यजातीला अपायकारक आहे —

(A) जैविक शस्त्रे (B) रासायनिक अस्त्रे

(C) अणू शस्त्रे (D) क्षेपणास्त्र.

उत्तर : ______

37. भारतात 28 राज्ये, 1 राष्ट्रीय राजधानी प्रदेश आणि 6 केंद्रशासित प्रदेश निर्माण करण्यात आले आहेत, कारण

(A) देशाचा कारभार व्यवस्थित व योग्य प्रकारे चालविण्यासाठी

(B) देशाचा कारभार अकार्यक्षम पद्धतीने चालविण्यासाठी

(C) वाईट व्यवस्थापन

(D) देशाचा कारभार कडक करण्यासाठी.

उत्तर : ______

38. दक्षिणपूर्व व्यापारी वारे 'फेरेल्स लॉ' तत्वाप्रमाणे आपली दिशा बदलून नैऋत्य वारे बनतात, कारण

(A) कमी दाब — उत्तर भारत (B) कमी दाब — दक्षिण भारत

(C) कमी दाब — पूर्व भारत (D) जास्त दाब — पश्चिम भारत.

उत्तर : ______

39. कुटिर उद्योग आणि लघु उद्योगांचा पर्याय भारतीय लोकांना योग्य आहे कारण

(A) रोजगार उपलब्ध होतात (B) कमी भांडवली धंदे आहेत

(C) स्वदेशी मालावर आधारित उद्योग (D) विद्युत शक्ती कमी लागते.

उत्तर : ______

40. राष्ट्रीय उद्यानांची ( National Parks ) निर्मिती या साठी केली आहे —

(A) अरण्यांचे संवर्धन

(B) पक्ष्यांना संरक्षण देणे

(C) वन्यजीवांचे रक्षण करण्याकरीता

(D) वाघांना जीवदान देण्यासाठी.

उत्तर : ______________________________

41. टीक ( सागवान ) आणि साल वृक्ष पानझडी वृक्ष अरण्यात वाढतात, तर सदाहरित अरण्य प्रदेशात वाढणारी झाडे म्हणजे

(A) बांबू आणि पाम

(B) कॅकटस् आणि जंगली खजूर

(C) बाभूळ आणि कसावी

(D) एबोनी आणि महोगनी.

उत्तर : ______________________________

42. भारतात जलसिंचनाची सर्वत्र वापरली जाणारी पद्धत या पैकी एक आहे —

(A) विहिरीतून पाणी पुरवठा

(B) तलावातून पाणी पुरवठा

(C) कालव्यातून पाणी पुरवठा

(D) ठिबक सिंचन पाणी योजना.

उत्तर : ______________________________

43. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायुच्या वाहतुकीकरीता पाईपलाईन ( नळ ) वाहतुक हे साधन अत्यंत उपयुक्त आहे, कारण

(A) मालाचे तुकडे पडून नुकसान होत नाही

(B) थेट बंदराला जोडले आहे

(C) वाहतुकीला विलंब किंवा गळून नुकसान नाही

(D) कमी खर्चाची व्यवस्था.

उत्तर : ______________________________

44. सध्या देशातील प्रदेशांतर्गत जलवाहतुकीला अधोगती आली आहे, कारण

(A) समांतर लोह आणि राजमार्ग

(B) हवाई वाहतूक वाढली

(C) जास्त खर्चिक आहे

(D) विलंब लागतो.

उत्तर : ______________________________

45. नैसर्गिक संकटातून वाचविण्यासाठी शेतकऱ्यांकरीता सरकारने कोणती उपाय योजना केली आहे ?

(A) भारतीय अन्न निगमची स्थापना (B) सहकारी सोसायटींची स्थापना

(C) पीक विमा योजना (D) जनता बाजारांची स्थापना.

उत्तर : ________________

46. कुटिर आणि लघु उद्योगांना आर्थिक मदत देण्यासाठी या संस्थेची स्थापना सरकारने केली आहे —

(A) राज्य अर्थ निगम (B) औद्योगिक विकास बँक ( IDBI )

(C) राष्ट्रीकृत बँक (D) स्टेट बँक ऑफ इंडिया.

उत्तर : ________________

47. प्राचीन भारतातून निर्यात होणारी वस्तू

(A) चींटाचे कापड (B) हिरे

(C) मसाल्याचे पदार्थ (D) मलमलचे कापड.

उत्तर : ________________

48. 1773 मध्ये पास झालेल्या रेग्युलेटिंग ॲक्टची आवश्यकता होती, कारण

(A) राज्य वाढविण्यासाठी

(B) राज्य कारभारात हस्तक्षेप

(C) भारतावर राज्य करण्यासाठी

(D) ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी.

उत्तर : ________________

49. 1935 मध्ये गव्हर्नमेण्ट कोणती शासन पद्धत प्रांतातून रद्द करून केंद्र सरकारात आणली गेली ?

(A) लोक नियुक्त सरकार (B) राजेशाही

(C) डायार्की (D) समाजवादी सरकार.

उत्तर : ________________

50. कोणत्या मुख्य उद्देशाने ॲनी बेझंट यांनी 'सेंट्रल हिन्दू कॉलेज'ची स्थापना केली ?

(A) हिन्दू संस्कृतिचे संवर्धन (B) समानतेचा विकास करण्यासाठी

(C) बंधुत्वाची भावना विकसित करण्यासाठी (D) सहअस्तित्व बनण्यासाठी ।

उत्तर : ________________

51. संगोळी रायण्णाने ब्रिटिशां विरुद्ध लढाई चालू ठेवली, कारण

(A) त्याला राजा व्हायचे होते

(B) ब्रिटिशांना धडा शिकवण्यासाठी

(C) कित्तूर पुन्हा जिंकून घेण्यासाठी

(D) राणी चन्नमाच्या दत्तक पुत्राला पुन्हा गादीवर बसविण्यासाठी.

उत्तर : __________

52. बेकायदेशीरपणे जम्मू-काश्मीरच्या काही प्रदेश बळकावला आहे, त्याला भागाला असे म्हणतात —

(A) आझाद काश्मीर (B) पाक व्याप्त काश्मीर ( POK )

(C) विशेष दर्जाचे राज्य (D) अकाशीचिन.

उत्तर : __________

53. स्टॅलिन यांचे स्मरण आपल्याला आजही होते, कारण

(A) त्यांच्या वार्षिक योजना पद्धतीमुळे (B) खासगी मालमत्ता रद्द केली

(C) पंचवार्षिक योजना पद्धतीचा जनक (D) सहकारी शेतीची शुरुआत केली.

उत्तर : __________

54. इटली आणि जर्मनी मध्ये हुकुमशाही अस्तित्वात आली, कारण

(A) पहिले जागतिक युद्ध (B) समाज व्यवस्था ढासळली होती

(C) अराजकता (D) जागतिक आर्थिक मंदी.

उत्तर : __________

55. मेजी राजपुत्राच्या पुनर्स्थापनेमुळे जपानची पुढील पैकी एका क्षेत्रात प्रगती झाली —

(A) एक श्रीमंत औद्योगिक राष्ट्र (B) एक श्रीमंत कृषी प्रधान राज्य

(C) एक शेतीने समृद्ध राज्य (D) संपूर्ण साक्षरता असलेले राष्ट्र.

उत्तर : __________

56. 'कॉमनवेल्थ ऑफ नेशन्स' ( अनेक देशांचा स्वतंत्र समाज ) म्हणजे

(A) यूरोपियन देशांची संघटना

(B) इंग्रजांच्या नवीन वसाहतींची संघटना

(C) एकेकाळच्या ग्रेट ब्रिटन वसाहतीखाली असलेल्या देशांची संघटना

(D) इंग्लंड बरोबर स्वयंस्फुर्तीने सामील झालेल्या देशांचा समुदाय.

उत्तर : __________

57. उत्तर भारताच्या मैदानी प्रदेशाला 'भारताचे हृदय' म्हणतात, कारण

(A) येथून बारमाही वाहणाऱ्या नद्या आहेत

(B) मैदानी प्रदेश

(C) शेतीकरीता सुपिक जमीन आहे

(D) पाणी पुरवठ्यासाठी कालवे आहेत.

उत्तर : ____________________

58. समाजातील विरोधाभास घालविण्यासाठी कार्ल मार्क्सचा आदर्शवाद काय होता ?

(A) श्रमजीवी वर्गाचे वर्चस्व हवे.

(B) झारची सत्ताच योग्य होती.

(C) शेतकऱ्यांचे राज्य असले पाहिजे.

(D) सामान्य जनतेचे राज्य असावे.

उत्तर : ____________________

59. राष्ट्र संघाला ( लीग ऑफ नेशन्स ) अपयश आले, कारण

(A) अमेरिका ( U.S.A. ) राष्ट्र संघात सामील झाली नाही.

(B) बडी राष्ट्रे राष्ट्र संघात सहभागी झाली नाहीत.

(C) राष्ट्र संघाकडे लष्करी सामर्थ्य नव्हते.

(D) नि:शस्त्रीकरण करण्यात अपयश आले.

उत्तर : ____________________

60. 'मंचू' वंशाने चीन मध्ये शेवटचा राजा म्हणून राज्य केले, कारण

(A) मंचू राजा दुर्बळ आणि अकार्यक्षम होता

(B) फ्रान्स बरोबर व्यापारी संबंध

(C) इंग्लंड कडून चीन पराभूत झाला

(D) अमेरिकेला ( U.S.A. ) व्यापारी हक्क मिळाले.

उत्तर : ____________________

## PART - B

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **दोन** वाक्यात लिहा : $6 \times 2 = 12$

61. डुप्ले कोण होता ? त्याची महत्त्वाकांक्षा काय होती ?

62. श्रीरंगपट्टण करारातील कोणत्या दोन अटी टिपुला निष्प्रभ करण्यास कारणीभूत झाल्या ?

63. मुलांच्या कल्याणाकरीता युनोच्या महासभेने मान्य केलेले जे हक्क आहेत त्यापैकी कोणतेही चार लिहा.

64. उत्पादक उद्योगधंदे म्हणजे काय ? त्याचे प्रकार कोणते ?

65. भारतीय नियोजन मंडळाची दोन कार्ये कोणती आहेत ?

66. सर एम० विश्वेश्वरय्या यांनी केलेली कोणतीही दोन विकासात्मक कार्ये लिहा.

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **तीन** वाक्यात लिहा : 4 × 3 = 12

67. 1857 च्या क्रान्ती मध्ये अपयश येण्याची कोणतीही तीन कारणे लिहा.

68. संयुक्त राष्ट्र संघटनेची ( UNO ) उद्दिष्टे लिहा.

69. उपजिविकेची शेती, व्यापारी शेती आणि संयुक्त शेती म्हणजे काय ?

70. भारतीय विदेश व्यापाराची कोणतीही तीन वैशिष्ट्ये लिहा.

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **आठ** वाक्यात लिहा : 3 × 4 = 12

71. जहाल आणि मवाळ यांच्यातील फरक कोणता ते स्पष्ट करून द्या. मवाळ गटाच्या चार मागण्या कोणत्या होत्या ?

72. दारिद्र्य म्हणजे काय ? दारिद्र्याला आळा घालण्यासाठी सरकारने कोणते उपाय योजले आहेत ?

73. भारतीय शेती मागासलेली राहण्याची कारणे कोणती ?

74. भारताचा नकाशा काढून त्यात पुढील स्थळे दाखवा : 1 + 3 = 4

a) कावेरी नदी b) कोलकाता c) $82\frac{1}{2}^{\circ}$ पूर्वी रेखांश.

**सूचना : केवळ अंध विद्यार्थ्यांकरीता पर्यायी प्रश्न ( प्रश्न संख्या 74 च्या पर्यायी ) :**

भारताचे स्वाभाविक ( नैसर्गिक ) प्रदेश कोणते ? भारताच्या आर्थिक प्रगती मध्ये किनार पट्टीची मैदाने कशी सहाय्यक ठरली आहेत ? 4